फिर्याद                                        दिनांक --        २२/०३/२०२३

श्री सचिन लक्ष्मण पाटील वय-- ४२ वर्षे, व्यवसाय -- नोकरी, पोलीस निरीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, सर पोचखानावाला रोड, वरळी मुंबई --३०, रा.ठि. ए ७०३, महावीर दर्पण, सेक्टर २७ नेरूळ पुर्व नवी मुंबई ४००७०६, मो. क्र. ८२०८८००६४२.

--- --- ---

मी वरील प्रमाणे असुन दिनांक ऑगस्ट २०१९ रोजी पासुन मी मुंबई विभाग येथे एक टप्पा पदोन्नतीवर पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे आलोसे डॉ. गजानन तुळशीराम भगत, वैदयकिय अधिकारी, महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, परेल, मुंबई यांचेविरूध्द गु.र.क्र. ४३/२०१६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने लोकसेवक यांचे निवासस्थान बिल्डींग नं १, फ्लॅट नं १, तळ मजला, एमजीएम हॉस्पीटल क्वॉटर्स, डॉ एस एस राव रोड परेल मुंबई .या घराची दिनांक ०४/०७/२०१६ रोजी दोन पंचासमक्ष घरझडती घेतली असता घरझडतीमध्ये मिळून आलेली रोख रक्कम, स्थावर व जंगम मालमत्तेबाबत कागदपत्रे याबाबतचा अहवालावरून मा. महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेविरूध्द उघड चौकशी सुरू करण्याबाबत जा. क्रं. ४१५/लाप्रवि/बीएमसु/वा--१/उचौक्र. ०१/१७, दि. ११/०१/२०१७ रोजी अन्वयेच्या आदेशाप्रमाणे उघड चौकशी क्रं. ०१/१७ सुरू करण्यात आली. यापुर्वीचे चौकशी अधिकारी सपोआ वैदय लाप्रवि मुंबई विभाग येथुन बदली झाल्याने नमुद प्रकरण पुढील चौकशीकामी आम्हाला वर्ग झाले.

उघड चौकशी दरम्यान तत्कालीन चौकशी अधिकारी यांनी नमुद उघड चौकशीचा मा. वरिष्ठांना कृती आराखडा सादर केला तसेच आलोसे यांचेकडुन मत्ता व दायित्वाचे १ ते ६ फॉर्म व स्वयंघोषणा पत्र भरून घेतले. आलोसे यांचे स्थावर व जंगम मालमत्ते बाबत माहिती मिळुन येईल अशा विविध शासकीय आस्थापनांना पत्रव्यवहार केला. आलोसे यांनां त्यांच्या मालमत्ता, खर्च, उत्पन्न याविषयी माहीती देण्याकरीता व खुलासा सादर करण्याकरीता जबाब नोंद करण्याकामी वांरवार पत्रव्यवहार करण्यात आला परंतु ते चौकशीकामी हजर राहीलेले नाहीत अगर कोणतीही माहीती किंवा खुलासा लेखी स्वरूपात सादर केला नाही. विविध आस्थापनांकडुन प्राप्त माहिती खालीलप्रमाणे.

**आलोसे व त्यांचा कौटुंबिक इतिहास खालील प्रमाणे.**

<u>कौटुंबिक इतिहास:--</u>

आलोसे यांना अनेकवेळा करण्यात आलेल्या पत्रव्यवहारानंतरही ते चौकशीकामी लाप्रवि मुंबई कार्यालयात हजर न राहील्याने त्यांची वैयक्तिक अथवा कौटुंबिक माहिति मिळालेली नाही. तथापि आलोसे कार्यरत असलेल्या महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, परेल, मुंबई या कार्यालयाशी या कार्यालयाचा जा.क्र.१६९२/ला.प्र.वि/बृमुवि/१७, दि.१३.०२.२०१७ व जा.क्र.३१०२/ला.प्र.वि/बृमुवि/१७, दि.२४.०३.२०१७ अन्वये माहीती विचारणा केली असता, वैद्यकिय अधिक्षक, महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, परेल, मुंबई यांनी त्यांचेकडिल जा.क्र. मगारु/लाप्रवि/माहिती/२०१७/१८२२, दि.१२/०५/२०१७ अन्वये आलोसे यांचे सेवापुस्तकाच्या प्रमाणित छायांकित प्रती व वेतनाची माहिती या कार्यालयास सादर केली. त्यानुसार आलोसे यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे.

ला.प्र.वि. मुंबई गु.र.नं. 12/2023 भ्र०प्रति.अधि 1988 चे क 13(1)(2) प्रमाणे 21/3/23 12/45वा. स्टे.डा.नोंद 16/23

Scanned with OKEN Scanner

आलोसे यांचे पुर्ण नाव गजानन तुळशीराम भगत असे असुन जात– हिंदु, महार अशी आहे. आलोसे यांचा मुळ पत्ता– मु.लाठी, पो. शेलुबाजार, ता. मंगळुरपीर, जि. अकोला. सध्या रा.१/१२, एम.जी.एम. हॉस्पीटल क्वार्टस, परेल, मुंबई, १२, असा आहे. सेवापुस्तकानुसार आलोसे यांचा जन्मदिनांक ३० जुन १९६७ असा असुन आलोसे यांनी त्यांचे एम.बी.बी.एस.चे शिक्षण ऑक्टोबर १९९४ मध्ये पुर्ण केले असुन एम.एस.ची डिग्री जुलै २००४ मध्ये प्राप्त केली आहे. आलोसे हे दिनांक. ०५ जुन २००० रोजी R.M.O. ( CASULTY ) या पदावर नियुक्त झाले असुन आलोसे यांची दिनांक. ०१/०२/२००८ रोजी जनरल सर्जन या पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. आलोसे यांच्या पत्नीचे पुर्ण नाव डॉ. सौ सुनिता गजानन भगत असे असुन जात–हिंदु, चांभार अशी आहे. सौ सुनिता भगत यांची जन्मदिनांक १७ मार्च १९७१ अशी आहे. सौ सुनिता भगत यांनी त्यांचे एम.बी.बी.एस. चे शिक्षण सन १९९३ मध्ये पुर्ण केले असुन एम.डी. (स्त्री रोगतज्ञ) ही पदवी सन १९९७ रोजी प्राप्त केली आहे. डॉ सौ सुनिता भगत यांची नेमणुक स्त्रीरोग विभागामध्ये ऑनररी कन्सल्टंट म्हणुन डिसेंबर २००१ मध्ये देण्यात आली व पुर्ण वेळ नियमित नेमणुक दि. ०१/०२/२००८ रोजी देण्यात आली आहे.

**नोकरीचा इतिहास :–**

आलोसे हे दि. ०५ जुन २००० रोजी R.M.O. ( CASULTY )या पदावर नियुक्त झाले असुन आलोसे यांची दि. ०१/०२/२००८ रोजी जनरल सर्जन या पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उघड चौकशीमध्ये डॉ. भगत यांच्या अपसंपदेची गणना करण्याकरीता दिनांक ०१/०२/२००८ ते ०४/०७/२०१६ हा कालावधी ग्राह्य धरण्यात आला होता. उघड चौकशीमध्ये डॉ.भगत यांचे नमुद कालावधीमधील एकूण उत्पन्न, एकूण खर्च, एकूण स्थावर व जंगम मालमत्तेसंदर्भातील सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

**आरोपी लोकसेवक डॉ. गजानन तुळशीराम भगत,यांची मालमत्ता, उत्पन्न व खर्च बाबत सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे.**

(अ)–परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता–        रु. १,४८,३०३/–

| क्र. | (अ)–परिक्षण कालावधी पुर्वीची स्थावर मालमत्ता तपशील– | किंमत |
|---|---|---|
| | निरंक | ०० |

| | (अ–१)–परिक्षण कालावधीपुर्वीची जंगम मालमत्ता तपशील– | किंमत |
|---|---|---|
| | पंजाब नॅशनल बँक खाते क्र.००६४०१०४००५२७८५० मधील शिल्लक रक्कम. | १४८३०३ |
| | परिक्षण पुर्वीची एकूण स्थावर व जंगम मालमत्ता रक्कम.... | १४८३०३ |

(ब)–परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता–        रु. ३०,७३,४५३/–

| अ.क्र. | मालमत्तेचे वर्णन | किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | एल.आय.सी. मधील गुंतवणुक | ४३५७५९ |
| | अ) एल.आय.सी. पॉलीसी क्र. ८९३०८२०९८ | २०२०९३ |
| | ब) एल.आय.सी. पॉलीसी क्र. ९०४९६८०७३ | २३३६६६ |
| २ | मारुती वॅगन आर कार क्र. MH-01-BG-7351 | ४३८८०९ |
| ३ | मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनीची पॉलीसी क्र. [illegible] व | ६०००० |

| | | |
|---|---|---|
| | ५५६९७०६०६ साठी केलेली गुंतवणुक | |
| ४ | पंजाब नॅशनल बँक, लालबाग शाखा येथे खाते क्रमांक ००६४०१०४००५२७८५०मधील शिल्लक रक्कम | ४५७०१२ |
| ५ | पंजाब नॅशनल बँक, लालबाग शाखा येथे खाते क्रमांक ६२०२०००४००००३३७१मधील शिल्लक रक्कम | १४७२२७ |
| ६ | बँक ऑफ इंडिया मधील संयुक्त खाते क्र. ००३९१०११००००२६३९ मधील शिल्लक रक्कम | २२५४ |
| ७ | SIP व्दारे म्युच्युअल फंड मधील गुंतवणुक — | ४०५६०० |
| | अ) आदित्य बिर्ला सनलाईफ म्युचुअल फंडातील गुंतवणुक | १०१९०० |
| | ब) डी.एस.पी. टॉप १०० इक्वीटी फंड | १०१९०० |
| | क) एच.डी.एफ.सी.इक्वीटी फंड | ९९१०० |
| | ड) कोटक गोल्ड फंड | १०१९०० |
| ८ | पंजाब नॅशनल बँकेतील मुदत ठेव | १००००० |
| ९ | घरझडती पंचनामा दरम्यान मिळुन आलेली मालमत्ता | १०२६८०० |
| एकुण रक्कम रुपये | | ३०७३४५३ |

(क) आलोसे डॉ.गजानन भगत यांच्या उत्पन्नाचा तपशिल      रु.४८,३५,२६५/—

| अ.क्र. | उत्पन्नाचा तपशिल | किंमत रूपये |
|---|---|---|
| १. | निव्वळ वेतन (परिक्षण कालावधी दि. ०१/०२/२००८ ते ०४/०७/२०१६) | ३५६९७८८/— |
| २. | गोकुलाम चीट फायनन्स डिव्हिडंट ( २००८ ते २०१६ ) | २५६०००/— |
| ३. | वॅगन आर कार खरेदी करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडीया, पेडडर रोड शाखा यांच्या कडून घेतलेले कार लोन ( २०१३ ) | ३०००००/— |
| ४. | पंजाब नॅशनल बँक मधील व्याज (अ.नं. ००६४०१०४००५२७८५०) | ६८६७७/— |
| ५. | पंजाब नॅशनल बँकमधील व्याज (अ.नं. ६२०२०००४००००३३७१) | ७८८३/— |
| ६. | बँक ऑफ इंडियातील व्याज(अ.नं. ००३९१०११००००२६३९) | ५२५/— |
| ७. | महात्मा गांधी स्मारक रुग्णालय कामगार सहकारी पतपेढीमधील वर्गणी वरील व्याज | ५८१२५/— |
| ८. | महात्मा गांधी स्मारक रुग्णालय कामगार सहकारीपतपेढीमधील संचित ठेव वरील व्याज | २५९१७/— |
| ९ | महात्मा गांधी स्मारक रुग्णालय कामगार सहकारी पतपेढीमधुन घेतलेले कर्ज | ४०००००/— |
| १०. | बँक ऑफ इंडिया मधुन घेतलेले कर्ज | १४८३५०/— |
| | एकूण रक्कम रुपये | ४८३५२६५/— |

Scanned with OKEN Scanner

(ड) आलोसे डॉ गजानन तुळशीराम भगत यांच्या खर्चाचा तपशिल ४६७४६४१/-

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | नाशाबोतीचा खर्च ( ढोबळ वेतनाने १/३ रक्कम शामील न करता येणारा घरखर्च.) | १५०५४२१ |
| २ | मुलांच्या शिक्षणाचा खर्च. | १८१३११ |
| ३ | फ्लॅटनं. ३०२, तिसरा मजला, आकांक्षा हाईट्स, लोअर परेल, मुंबई येथील घरासाठी भरलेले मुद्रांक शुल्क व नोंदणी फी. | ४३८९४० |
| ४ | फ्लॅटनं. ३०२, तिसरा मजला, आकांक्षा हाईट्स, लोअर परेल, मुंबई येथील घरासाठी पंजाब नॅशनल बँकेचे चेक नं. ४६८०११,४६८०१२,४६८०१३ याद्वारे रक्कम दिली. | ४९५००० |
| ५ | आलोसे यांनी खरेदी केलेल्या वॅगन आर कारसाठी भरलेले रजिस्ट्रेशन चार्जेस | ४२६३६ |
| ६ | नाशाबोतीच्या खर्चा व्यतिरीक्त बँकेतुन केलेला इतर खर्च | १०४२४४२ |
| ७ | बँक ऑफ इंडिया कडुन घेतलेल्या कर्जाची परतफेड | १८२२९० |
| ८ | वॅगन आर कारसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया कडुन घेतलेले कर्ज परतावा. | २३३४०६ |
| ९ | बँक खात्यातुन विमा पॉलीसीसाठी आदा केलेली रक्कम | ६३८४ |
| १० | दुरध्वनीवरील (एमटीएनएल व लूप मोबाईल) करीता पंजाब नॅशनल बँक खात्यातुन केलेला खर्च | ५९९३२ |
| ११ | बँकेतुन चेक/ऑनलाईन दिलेल्या रक्कमा | १०७२९० |
| १२ | बँक ऑफ इंडिया कडुन घेतलेल्या कर्जाची खर्चलेली रक्कम | १४८३५० |
| १३ | पंजाब नॅशनल बँक खात्यातुन दरमहा ५००० प्रमाणे ट्रान्सफर केलेली रक्कम | १०५००० |
| | एकुण रक्कम रुपये | ४६७४६४१/- |

डॉ. गजानन तुळशीराम भगत यांचे ''उत्पन्न'', ''खर्च'' व ''मालमत्ता'' याबाबत एकत्रित स्थिती खालीलप्रमाणे निष्पन्न झालेली आहे.

| अपसंपदेचा तपशील | | | |
|---|---|---|---|
| १ | परिक्षण कालावधी मधील मालमत्ता | (विधान 'ब') | ३०७३४५३/- |
| २ | परिक्षण कालावधी पुर्वीची मालमत्ता | (विधान 'अ') | १४८३०३ /- |
| ३ | परिक्षण कालावधी एकुण मालमत्ता | (ब—अ) | २९२५१५०/- |
| ४ | परिक्षण कालावधी एकुण खर्च | (विधान 'ड') | ४६७४६४१/- |
| ५ | परिक्षण कालावधी मालमत्ता व खर्च | ( ३+४ ) | ७५९९७९१ /- |
| ६ | परिक्षण कालावधी एकुण उत्पन्न | (विधान 'क') | ४८३०२६५ /- |
| ७ | अपसंपदा | (५—६) + DA | [illegible] /- |

फिर्यादी श्री सचिन लक्ष्मण पाटील यांना जबाब पुढे चालू... दि. २१/०३/२०२३



| | | |
|---|---|---|
| ८ | अपसंपदेची टक्केवारी $\frac{DA}{TOTAL\ INCOME}$ *100 | ५७.१७ % |

आलोसे डॉ. गजानन तुळशीराम भगत यांना दिनांक ०१/०२/२००८ ते ०४/०७/२०१६ या कालावधीत एकुण रु. ४८,३५,२६५/– एवढे उत्पन्न मिळालेले आहे. आलोसे डॉ. गजानन तुळशीराम भगत यांनी केलेला खर्च व स्वतः च्या नावे संपादीत केलेली मालमत्ता ही त्यांच्या ज्ञात उत्पन्नापेक्षा रु.२७,६४,५२६ ने अधिक आहे.

आलोसे डॉ. गजानन तुळशीराम भगत, वैदयकिय अधिकारी, महात्मा गांधी रुग्णालय, परेल, मुंबई यांनी परीक्षण कालावधी ( दिनांक ०१/०२/२००८ ते ०४/०७/२०१६) मध्ये रु. २७,६४,५२६ (५७.१७%) इतकी अपसंपदा संपादित केल्याचे निष्पन्न झाले आहे.

तरी डॉ. गजानन तुळशीराम भगत, वैदयकिय अधिकारी, महात्मा गांधी रुग्णालय, परेल, मुंबई यांनी वर नमूदप्रमाणे भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशीर आणि ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक अपसंपदा संपादित केली आहे म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (इ), सह कलम १३ (२) अन्वये माझी सरकारतर्फे त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

माझी फिर्याद वाचून पाहिली असता माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(माना सुर्यवंशी)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

21.3.
सचिन लक्ष्मण पाटील
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

Scanned with OKEN Scanner

FORM-1 A

NCRB 249
I.I.F.-1

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई प्र.मा.अ. No. 12/2023 वर्ष Year दिनांक Date 21/3/2023

2. (i) अधिनियम Act
(ii) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधिनियम 1988 कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections कलमे Sections 13(1)(E), 13(2)

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day तारीख पासून Date from 01/07/2008 वेळ Time तारीख पर्यंत Date to 01/7/2016 वेळ Time
केलेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 21/3/2023 वेळ Time

(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीतील नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 16/23 तारीख Date 21/3/23 वेळ Time 12/45 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. लोकसेवकांचे स्थावर व जंगम मालमत्ता धारण ठिकाण चौकी / बीट क्रमांक नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ठिकाणाचे नंबर No. if any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place गाव Village पोस्ट Post तालुका Taluka जिल्हा Distt. राज्य State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station तालुका Taluka जिल्हा Distt. राज्य State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्रीo सचिन पाटील (b) वडीलांचे / पतीचे नाव Father's /Husband's Name श्री लक्ष्मण पाटील
(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 42 (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8108800641
(e) पारपत्र क्रमांक Passport No. दिल्याचा दिनांक Date of Issue दिल्याचे ठिकाण Place of Issue (f) व्यवसाय Occupation
(g) धर्म Religion हिंदु जात Caste जनजात Sub-Caste
(h) पत्ता : Address : गल्ली / सर्वे नं. Ward घर / नाव नंबर House/Name No. फोन / मो. नंबर Phone/M. No. पॅन नं. Pan No. फॅक्स नं. Fax No.
A-703 महावीर दर्शन सेक्टर 27, नेरुळ (पू) नवी मुंबई 400706
रस्त्याचे नाव Road जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place गाव Village पोस्ट Post पो. स्टे. P. Stn.
तालुका Taluka जिल्हा Distt. राज्य State सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर घेण्यात यावे व तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.) Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) डॉ. गजानन तुकाराम भगत वय 55 वर्षे धंदा नौकरी
रा. 1/12 MGM हॉस्पीटल्स क्वॉर्टर्स परेल, मुंबई 12

Scanned with OKEN Scanner

फिर्याद  दि. 21/3/2023

मी श्री. सचिन लक्ष्मण पाटील वय 42 धंदा - नोकरी पोलीस निरीक्षक (ट.प) रा. A/703 महावीर दर्शन सेक्टर. 27 नेरूळ (पू) नवीमुंबई यांचा सविस्तर जबाब आज दि. 21/3/2023 रोजी सांगणीनुसार नमूद झाला असून तो सोबत जोडला असून तीच गुन्ह्यांची प्रथम खबर समजण्यात येत आहे.

समक्ष

(नाना सूर्यवंशी)
पोलीस निरीक्षक
का.प्र.वि. मुंबई

७८

8\. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे — चौकशी अंती

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9\. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10\. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11\. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक :

Unnatural / Accidental Death Case No., if any

12\. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required). Detail write down back blank page.

यातील लोकसेवक डॉ. गजानन तुळशीराम भगत यांनी लोकसेवक या नात्याने कर्तव्य पार पाडत असताना दि. 01/02/2008 ते 04/7/2016 या कालावधीमध्ये भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशीर व ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक किंमतीची अशी रुपये 27,64,526/- रक्कमेची अपसंपदा संपादित केली म्हणून लोकसेवक यांचे विरुद्ध भ्र.प्र. अधि. 1988 चे कलम 13(1)(E) व 13(2) प्रमाणे गुन्हा

13\. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपास हाती घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2\. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3\. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................, जिल्हा ................, राज्य ................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. ................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................ (3) Transferred to P.S ................ District ................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामुल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14\. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name — नाना आनंद सूर्यवंशी

पदनाम Rank — पोलिस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड. क्र. — ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I.O. ................

15\. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख

1\. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner